महागाईचा कडेलोट!

'एसबीआय रिसर्च'चा अंदाज, सप्टेंबरमध्येच ५.६५ टक्के नोंदवला जाण्याची शक्यता

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी



मुंबई : जागतिक आर्थिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर, चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीत महागाईचा पारा तीव्रतेने चढत जाण्याची शक्यता 'एसबीआय रिसर्च'ने जाहीर केलेल्या पूर्व-पतधोरण अहवालात व्यक्त केली आहे. सप्टेंबर महिन्यात किरकोळ महागाई दर वाढून ५.६५ टक्क्यांवर पोहोचेल, तर ऐन सणासुदीत म्हणजे ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यात हा दर ६.५ टक्क्यांची मजल गाठेल, असाही अहवालाचा इशारा आहे.

वाढती महागाई, जागतिक आव्हाने आणि रुपयावर असलेला ताण यांमुळे रिझर्व्ह बँक येत्या आठवड्यात ५ ते ७ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या पतधोरण समितीच्या बैठकीत रेपो दरात किमान २५ आधार बिंदूंची (पाव टक्का) वाढ करेल, असा अंदाज देशातील सर्वात मोठ्या बँकेच्या अर्थतज्ज्ञांनी या अहवालातून वर्तवला आहे. म्हणजे सध्या ५.२५ टक्के असलेला रेपो दर लवकरच ५.५ टक्क्यांवर जाण्याची शक्यता आहे.

या आधी ऑगस्ट महिन्यात किरकोळ महागाई दर वाढून ४.८२ टक्क्यांवर पोहोचला आहे. विशेष म्हणजे, नवीन आधारभूत वर्षानुसार मालिकेत महागाई मोजण्यासाठी गृहीत धरल्या जाणाऱ्या वस्तूंची व्याप्ती वाढली आहे. जानेवारीत केवळ २२ वस्तूंमुळे ९० टक्के महागाई ठरत होती, ती संख्या ऑगस्टमध्ये वाढून ५१ वर पोहोचली आहे. म्हणजेच महागाईचे मापन अधिक सर्वसमावेशक बनले आहे.

यावर्षी नैऋत्य मोसमी पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या ८७ टक्क्यांवर राहिला असून, देशातील ४३ टक्के जिल्ह्यांमध्ये अपुरा पाऊस पडला आहे. एल निनोची तीव्र स्थिती आणि ऑक्टोबरमधील कमी पाऊस यामुळे रबी पिकांवर आणि पर्यायाने अन्नधान्याच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढण्याची भीती अहवालाने व्यक्त केली आहे.

'जीडीपी' वाढीच्या अंदाजात कपात शक्य

मजबूत अमेरिकन डॉलर, जागतिक तेल भडक्याने तेल कंपन्यांची परकीय चलनाची वाढलेली मागणी आणि परकीय गुंतवणूकदारांकडून सुरू असलेली सततची विक्री यांमुळे रुपयावर मोठा ताण आला आहे. या सर्व आव्हानांचा विचार करता 'एसबीआय रिसर्च'च्या मते, रिझर्व्ह बँकेकडून यंदाच्या बैठकीत आर्थिक वर्ष २०२७ साठीचा सकल राष्ट्रीय उत्पादन अर्थात जीडीपी वाढीचा अंदाज ३० आधार बिंदूंनी (०.३० टक्के) आणि महागाईचा अंदाज २० आधार बिंदूंनी (०.२० टक्के) वाढवण्याची शक्यता आहे. वाढत्या महागाईला लगाम घालण्यासाठी रिझर्व्ह बँकेने आजवर रेटलेली 'तटस्थ' धोरणाची भूमिकाही बाजूला सारून व्याजदर वाढवण्याच्या दिशेने पाऊल टाकावे लागू शकते.

'अदानीं'कडून महाराष्ट्रात २.६ लाख कोटी गुंतवणुकीचे प्रकल्प पूर्णत्वाला

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

फडणवीस यांच्या नेतृत्वाचे कौतुक



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांची अंमलबजावणी तसेच उद्योगांसाठी सुलभ वातावरण निर्माण करण्याच्या प्रयत्नांचे अदानी यांनी कौतुक केले. सरकारच्या 'वॉर रूम' पद्धतीचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

मुंबई : राज्यात ऊर्जा, विमानचालन, शहर पुनर्विकास, विदा केंद्र आणि कोळसा गॅसिफिकेशन यांसारख्या विविध क्षेत्रांतील प्रकल्पांमध्ये अदानी समूहाने सहा लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीचे वचन दिले असून, त्यापैकी सुमारे २.६ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प पूर्णही झाले आहेत, असा अदानी एंटरप्रायझेसचे संचालक प्रणव अदानी यांनी गुरुवारी दावा केला.

जागतिक आर्थिक मंचाच्या (वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम) दावोस येथील बैठकीदरम्यान करण्यात आलेल्या गुंतवणुकीच्या घोषणा तसेच महाराष्ट्र सरकारशी झालेल्या भागीदारीच्या माध्यमातून समूहाने राज्यातील गुंतवणुकीचा आराखडा तयार केला, असे अदानी यांनी राज्याच्या 'इन्व्हेस्ट महाराष्ट्र' या गुंतवणूक प्रोत्साहन उपक्रमाप्रसंगी सांगितले.

राज्यातील समूहाच्या गुंतवणुकीमध्ये विमानतळ आणि ऊर्जा क्षेत्राला महत्त्वाचे स्थान आहे. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाचे व्यवस्थापन अदानी समूहाकडून केले जाते. तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विकासही समूहाकडून होत आहे. या विमानतळांची वार्षिक प्रवासी हाताळणी क्षमता भविष्यात ९ कोटींपेक्षा अधिक होण्याची अपेक्षा आहे, असे अदानी यांनी सांगितले. अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेडच्या माध्यमातून मुंबईतील ३० लाखांहून अधिक घरे आणि आस्थापनांना विजेचे वितरण केले जात आहे. यासाठी १,००० मेगावॉट क्षमतेची उच्च-दाब वीजवाहिनी विकसित करण्याचे कामही सुरू आहे.

धारावी पुनर्विकास प्रकल्पाबाबत बोलताना अदानी यांनी स्थानिकांचे स्थलांतर करण्यापूर्वी त्यांना आधुनिक घरे देणे, सूक्ष्म उद्योगांचे औपचारिकरण करून त्यांचे संरक्षण आणि धारावीचा एकात्मिक आर्थिक केंद्र म्हणून विकास करणे, यावर समूहाचा भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भारती सहकारी बँकेकडून १२ टक्के लाभांश

पुणे : भारती सहकारी बँकेने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये १४.५३ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदवला असून, सभासदांना सलग दुसऱ्या वर्षी १२ टक्के लाभांशाची घोषणा बँकेने केली आहे. ही बँक म्हणजे सामान्यांना कर्ज पुरवठा करणारी आर्थिक लोकसंस्था आहे, असे प्रतिपादन भारती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. विश्वजीत कदम यांनी केले. विद्यापीठाच्या धनकवडी शैक्षणिक संकुलातील वैद्यकीय महाविद्यालयाच्या सभागृहात बँकेची ५५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच पार पडली. डॉ. पतंगराव कदम यांनी भारती बँकेची स्थापना अडचणीत सापडलेल्या सर्वसामान्य माणसास अर्थसहाय्य करण्यासाठी केली आहे. त्यामुळे आज समाजात तिची सर्वसामान्यांची बँक म्हणून ओळख आहे, असे डॉ. कदम म्हणाले. बँकेचा एकूण व्यवसाय २,७९०.१२ कोटी रुपये झाला असून, ढोबळ नफा २३.२९ कोटी रुपये आहे.

सह्याद्री फार्म्सच्या उत्पन्नात ३३.५ टक्के वाढ

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : अवकाळी पाऊस, हवामानातील अनिश्चितता आणि आंतरराष्ट्रीय व्यापारातील अडथळे अशा विविध संकटांना तोंड देत येथील सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेडने २०२५-२६ या आर्थिक वर्षात २,६०९.२७ कोटींचे उत्पन्न मिळवले. गतवर्षीच्या तुलनेत तो ३३.५ टक्के अधिक आहे.

दिंडोरी तालुक्यातील मोहाडी येथे झालेल्या कंपनीच्या १६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ही माहिती देण्यात आली. या वर्षात कंपनीचा परिचालन नफा २५८ कोटी, तर करोत्तर निव्वळ नफा ५५.१८ कोटी रुपये आहे. फळउत्पादक शेतकऱ्यांसाठी हे वर्ष विशेष आव्हानात्मक ठरले. दीर्घकाळ सुरू राहिलेल्या अवकाळी पावसाचा द्राक्ष, संत्रावर्गीय फळे आणि टोमॅटोला फटका बसला, तर पश्चिम आशियातील संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय वाहतूक व व्यापार विस्कळीत झाला. अशा परिस्थितीतही ताजी फळे-भाजीपाला आणि मूल्यवर्धित उत्पादने देशा-परदेशात विकणाऱ्या कंपनीचे ताज्या फळांच्या देशांतर्गत व्यवसायाचे उत्पन्न सुमारे ४४३ कोटींवरून, १,०१४ कोटींवर पोहोचले. २,३५५ महिलांसह एकूण ७,२२८ जणांना थेट रोजगार दिल्याचे कंपनीने म्हटले आहे. द्राक्षाच्या नव्या पेटंटेड वाणापाठोपाठ आता 'टँगो' या संत्रावर्गीय वाणाची चाचणी कंपनीकडून सुरू आहे.

विस्तारणारे शेतकरी जाळे

वर्षभरात सह्याद्री फार्म्स ५३,३२२ एकरांवरील ३०,३०२ शेतकऱ्यांना जोडले आणि ४,४६,३३५ टन शेतमालाची खरेदी केली.

> यंदाचा हंगाम अत्यंत कठीण होता. तरीही आमचे शेतकरी कुटुंब एकजुटीने उभे राहिले. सुधारित वाण, पीकविषयक ज्ञान, काढणीपश्चात पायाभूत सुविधा, प्रक्रिया क्षमता, विविध बाजारपेठा आणि सक्षम व्यवस्थापन प्रणालींमध्ये गुंतवणूक केली. भूतकाळात केलेली गुंतवणूक आज आमची ताकद बनत आहे
>
> - विलास शिंदे, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सह्याद्री फार्म्स

निर्मिती क्षेत्रात जोमदार सक्रियता

नवी दिल्ली : नवीन कार्यादेशासह उत्पादनात झालेली वाढीमुळे देशातील निर्मिती क्षेत्राने सरलेल्या सप्टेंबर महिन्यात सात महिन्यांतील उच्चांकी सक्रियता नोंदवल्याचे गुरूवारी जाहीर झालेल्या मासिक सर्वेक्षणातून समोर आले.

देशातील निर्मिती क्षेत्राचा प्रवास नोंदविणाऱ्या एचएसबीसी इंडियाद्वारे या क्षेत्रातील खरेदी व्यवस्थापकांचा कल जोखणाऱ्या सर्वेक्षणावर आधारित 'पीएमआय निर्देशांक' सप्टेंबर महिन्यात ५५.१ गुणांवर नोंदविण्यात आला. त्याआधीच्या (ऑगस्ट) महिन्यात हा निर्देशांक ५२.८ गुणांवर नोंदविला गेला होता.

परदेशी गुंतवणूकदारांकडून सप्टेंबरमध्ये ३५,८६० कोटींची विक्री

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी



मुंबई : सलग दोन महिने खरेदीनंतर, सरलेल्या सप्टेंबरमध्ये परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी (एफपीआय) दणक्यात समभाग विक्री करत, तब्बल ३५,८६० कोटी रुपये बाजारातून काढून घेतले.

जागतिक पातळीवरील वाढती अनिश्चितता, अमेरिकेतील उच्च व्याजदर आणि खनिज तेलाच्या वाढलेल्या किमतींच्या पार्श्वभूमीवर एफपीआयची भारतीय बाजाराकडे पाठ करून बाहेरचा रस्ता धरला आहे. 'सीडीएसएल'च्या आकडेवारीनुसार, विद्यमान ऑक्टोबरमध्येही विक्रीचा हा कल कायम राहिला. १ ऑक्टोबर रोजी एफपीआयनी भांडवली बाजारात ९,२३२ कोटी रुपये मूल्याच्या समभागांची विक्री केली. आधीच्या महिन्यांत, जुलैमध्ये २०,२०० कोटी आणि ऑगस्टमध्ये २९,६३० कोटींची त्यांनी नक्त खरेदी केली होती. मात्र, सप्टेंबरमधील विक्रीनंतर २०२६ मध्ये आतापर्यंत एफपीआयनी भारतीय समभागांतून सुमारे २.७० लाख कोटी रुपये काढले आहेत. २०२५ च्या संपूर्ण वर्षातील १.६६ लाख कोटी रुपयांच्या निर्गुंतवणुकीपेक्षा ही रक्कम अधिक आहे.

होर्मुझ सामुद्रधुनीशी संबंधित पुरवठ्याच्या जोखमीमुळे वाढलेले इंधनाचे दर, रुपयातील कमजोरी, अमेरिकेतील रोख्यांवरील वाढलेले परतावे, जुलै-ऑगस्टमधील गुंतवणुकीनंतर नफावसुली आणि कृत्रिम प्रज्ञेशी संबंधित आशियाई बाजारांकडे भांडवलाचा कल ही एफपीआयच्या विक्रीमागील प्रमुख कारणे आहेत, असे अल्फा एएमसीचे निधी व्यवस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश सिंगला यांनी सांगितले.

कर्जरोख्यांतूनही माघार

एफपीआयनी सप्टेंबरमध्ये रोखे बाजाराकडेही पाठ फिरवली आहे. 'फुली ॲक्सेसिबल रूट'मधून १०,४३१ कोटी रुपये, 'व्हॉलंटरी रिटेन्शन रूट'मधून ५,०४९ कोटी रुपये, तर सर्वसाधारण मार्गातून ५,२४६ कोटी रुपये काढण्यात आले आहेत.

महिंद्रा मनुलाइफचा 'एसआयएफ' श्रेणीत 'इक्विटी लाँग-शॉर्ट फंड'

मुंबई : महिंद्रा मनुलाइफ म्युच्युअल फंडाने आपल्या नव्या 'स्पेशलाइज्ड इन्व्हेस्टमेंट फंड' (एसआयएफ) व्यासपीठाअंतर्गत 'एमएसआयएफ इक्विटी लाँग-शॉर्ट फंड' ही नवीन गुंतवणूक योजना जाहीर केली आहे. योजनेचा एनएफओ कालावधी, ३० सप्टेंबर २०२६ ते १४ ऑक्टोबर २०२६ असा आहे. त्यानंतर फंडाचे युनिट्स निरंतर खरेदी-विक्रीसाठी २६ ऑक्टोबर २०२६ पासून खुले होतील.

पारंपरिक म्युच्युअल फंड आणि पोर्टफोलिओ मॅनेजमेंट सर्व्हिसेस (पीएमएस) यामधील अंतर भरून काढण्यासाठी सेबीने सुरू केलेले एसआयएफ हा गुंतवणूक प्रकार सुरू केला आहे.

कोल्हापूर अर्बन बँकेचा ११०० कोटींच्या ठेवींचा संकल्प

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

कोल्हापूर : मार्च २०२७ अखेर बँकेच्या ठेवी १,१०० कोटी रुपयांपुढे नेण्याचा तसेच बँकेला 'शेड्यूल्ड' आणि 'मल्टिस्टेट' दर्जा मिळवून देण्याचा संकल्प दि कोल्हापूर अर्बन को-ऑप. बँकेच्या ११३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत करण्यात आला. यावेळी सभासदांना १० टक्के लाभांश देण्याची घोषणा बँकेचे अध्यक्ष शिरीष कणेरकर यांनी केली.

पेटाळा येथील राम गणेश गडकरी सभागृहात झालेल्या सभेत बँकेच्या कामकाजाचा आणि प्रगतीचा आढावा घेण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी विजयकुमार बोरगांवकर यांनी विषयपत्रिकेवरील विषयांचे वाचन केले.

सभासदांनी त्यास आवाजी मतदानाने मंजुरी दिली. यावेळी गुणवंत सभासद व कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सभासदांचा सत्कार करण्यात आला.

अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सरव्यवस्थापक सत्यजित जगदाळे यांनी सभासदांच्या प्रश्नांचे उत्तरे देऊन निराकरण केले.

जी.एस. महानगर बँकेला ८.४५ कोटींचा निव्वळ नफा

मुंबई : जी.एस. महानगर बँकेला २०२५-२६ आर्थिक वर्षात ८.४५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. बँकेच्या ठेवींमध्ये १५३ कोटी रुपयांची वाढ होऊन, त्या ३,१७५ कोटी रुपयांवर पोहोचल्या आहेत. बँकेचे एकूण कर्जवाटप १,६६७ कोटी, खेळते भांडवल ३,९०४ कोटी, तर एकूण गुंतवणूक १,५९७ कोटी रुपये झाली आहे, अशी माहिती बँकेच्या अध्यक्षा गीतांजली शेळके यांनी दिली. सभासद, ठेवीदार आणि खातेदारांच्या विश्वासातून प्रगतीची भक्कम वाटचाल सुरू राखताना, बँकेने सातत्याने शून्य टक्के 'नक्त एनपीए' आणि



सलगपणे 'अ' लेखापरीक्षण वर्ग प्राप्त केला आहे, असेही त्या म्हणाल्या. परळ येथे जी.एस. महानगर बँकेची ५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. यावेळी उपाध्यक्ष भास्कर कवाद यांच्यासह संचालक मंडळाचे सदस्य उपस्थित होते. बँकेने मोबाईल बँकिंगद्वारे आयएमपीएस व्यवहाराची मर्यादा ५ लाखांवरून १० लाख रुपयांपर्यंत वाढविली आहे. त्यामुळे ग्राहकांना घरबसल्या मोठ्या रकमेचे व्यवहार जलद आणि सुरक्षितपणे करता येणार आहेत.

यूपीआय व्यवहारांमध्ये १.८ टक्क्यांनी घट

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : देशातील डिजिटल देयक व्यवहारांसाठी सर्वाधिक वापरात येणाऱ्या युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस अर्थात 'यूपीआय'मार्फत व्यवहारांच्या संख्येत सरलेल्या सप्टेंबर महिन्यांत ऑगस्टच्या तुलनेत १.८ टक्क्यांची घट झाली, असे रिझर्व्ह बँकेने गुरुवारी जाहीर केलेल्या आकडेवारीने स्पष्ट केले. येत्या १५ ऑक्टोबरपासून मोठ्या मूल्याच्या व्यापारी व्यवहारांसाठी 'एमडीआर' शुल्क पुन्हा लागू करण्याच्या निर्णयाचा संभाव्य परिणाम म्हणून या आकडेवारीकडे पाहता येईल.

रिझर्व्ह बँकेकडून प्रसिद्ध आकडेवारीनुसार, सप्टेंबरमध्ये यूपीआयच्या माध्यमातून २,४०७ कोटी व्यवहार झाले. ऑगस्टमध्ये ही संख्या २,४५० कोटी होती. मात्र यूपीआय व्यवहारांचे एकूण मूल्य सप्टेंबरमध्ये १.५ टक्क्यांनी घटून २९.३७ लाख कोटी रुपयांवर आले. ऑगस्टमध्ये हे मूल्य २९.८२ लाख कोटी रुपये होते.

दरम्यान, नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय) द्वारे संचालित या प्रणालीच्या माध्यमातून सप्टेंबरमध्ये व्यवहारांच्या संख्येत मासिक घट दिसत असली तरी दिवसाला होणाऱ्या सरासरी व्यवहारांमध्ये वाढ झाली आहे. ऑगस्टमध्ये ३१ दिवस असल्याने त्या महिन्यात एकूण व्यवहारांची संख्या तुलनेने अधिक राहिली. सप्टेंबरमध्ये ३० दिवस असल्यामुळे एकूण व्यवहार कमी दिसत आहेत. सप्टेंबरमध्ये दररोज सरासरी ८०.२ कोटी यूपीआय व्यवहार झाले, तर ऑगस्टमध्ये हा आकडा ७९.१ कोटी होता.

यूपीआयवरील मोठ्या मूल्याच्या व्यापारी व्यवहारांसाठी नव्याने ०.४ टक्के दराने व्यापारी सवलत दराची (एमडीआर) अंमलबजावणी येत्या १५ ऑक्टोबरपासून होत आहे.

Altum Credo Home Finance

अल्टम क्रेडो होम फायनान्स प्रा. लि.

नोंद. कार्यालय : मजला क्र. 7, कल्पतरू इन्फिनिया, प्लॉट क्र. 22, सर्व प्लॉट क्र. 3, सीटीएस क्र. 15/1, गाव भामुर्डा, वाकडेवाडी, शिवाजी नगर, पुणे शहर, महाराष्ट्र 411005.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 च्या नियम 8(6) आणि 9(1) सह वाचण्यात येणारा सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीसाठी लिलाव सूचना. याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदार यांना सूचना देण्यात येत आहे कि, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित धनको यांच्याकडे तारण / भाग्रग्रस्त आहे, ज्याचा ताबा सुरक्षित धनको म्हणून अल्टम क्रेडो होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड (यापुढे एसीएचएफएल म्हणून संदर्भित) च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, तसेच या मालमत्तेची विक्री खाली नमूद केलेले कर्जदार आणि जामीनदार यांच्याकडून अल्टम क्रेडो होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड (एसीएचएफएल) यांना देय असलेली खालील नमूद थकबाकी रक्कम सोबत त्यावरील भविष्यातील व्याज आणि खर्च या रकमेच्या वसुलीसाठी, **"जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" आणि "तेथे जे काही आहे" तत्त्वावर दि. 22/10/2026 (गुरुवार) रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 4.00 वा. विक्री केली जाईल.**

अ. क्र	कर्जदार / सह-कर्जदार आणि जामीनदारांचे नाव आणि कर्ज खाते क्रमांक	13(2) सूचना रक्कम आणि दिनांक	वसूलीची थकबाकी रक्कम (सुरक्षित कर्ज)	आरक्षित किंमत / बयाणा रक्कम / बोली वृद्धी रक्कम	निविदा उघडण्याची दिनांक व वेळ	ताबा प्रकार
1	हरिनारायण किसन कलावार (कर्जदार) जया हरिनारायण कलावार (सह-कर्जदार) कर्ज खाते : 1132020100001	रु. 226415.00 09-01-2026	रु. 286623.93 एनपीए दिनांक : 29-12-2026	रु. 7,88,413.50 / रु. 78,841.35 / रु. 10,000.00	22-10-26 स. 11.00 ते दु. 4.00	प्रत्यक्ष ताबा

सुरक्षित मालमत्तेचे वर्णन : पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, मोजमाप क्षेत्रफळ 00 हे. 18 आर पो. ख. 0 हे. 01 आर आणि त्यावर बांधले जाणारे घर सोबत त्याच्याशी संबंधित आणि सुखाधिकार गट क्र. 285/5 पैकी गाव मौजे जटप / त्र्यंबकपूर, तालुका राहुरी, जिल्हा अहमदनगर येथे स्थित, ग्रामपंचायत जटप - त्र्यंबकपूर, जिल्हा परिषद अहमदनगर, तालुका पंचायत समिती राहुरी च्या स्थानिक हद्दीत येते, उप निबंधक राहुरी च्या कार्यालयाच्या अधिकारक्षेत्रात येते, पूर्व - खुली जमीन, पश्चिम - खुली जमीन आणि सुनील तुपे यांच्या मालकीची मालमत्ता, दक्षिण - सुरेश किसन कलावार यांच्या मालकीची मालमत्ता, उत्तर - 30 फूट रस्ता.

अटी आणि शर्ती : उपरोक्त लिलावाच्या सविस्तर अटी आणि शर्ती https://altumcredo.co.in/pdf-viewer.php?file=TERMS%20AND%20CONDITIONS%20FOR%20AUCTION.pdf या वेबसाइटवर उपलब्ध आहेत आणि ते या लिलाव प्रकाशनाचा भाग मानले जावेत.

दिनांक : 03.10.26 ठिकाण : अहमदनगर

सही/- प्राधिकृत अधिकारी अल्टम क्रेडो होम फायनान्स प्रा. लि.

केनरा बैंक Canara Bank

सिंडिकेट Syndicate

एआरएम शाखा - मुंबई

कॅनरा बँक बिल्डिंग, चौथा मजला, आदी मझबान पथ, बलार्ड इस्टेट, मुंबई - 400 001.

ईमेल : cb2360@canarabank.com दूरध्वनी: 8655948019/54 वेब: www.canarabank.com

विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 च्या नियम 8(6) आणि 9 च्या तरतुदींसह वाचण्यात येणारा सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल असेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

याद्वारे कर्जदार व जामीनदार आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भाग्रस्त असलेल्या खाली नमूद अचल मालमत्तांचा कॅनरा बँक च्या प्राधिकृत अधिकारायांनी **सांकेतिक ताबा** घेतलेला असून या मालमत्तांची विक्री, **मे. एक्स्टसी इंजिनिअरिंग सोल्युशन्स,** यांचेकडून **कॅनरा बँक** च्या एआरएम शाखा, यांना घेणे असलेल्या देय रक्कम **रु. 45,27,048.6 (रुपये पंचेचाळीस लाख सत्तावीस हजार अठ्ठेचाळीस आणि साठ पैसे फक्त)** आणि **दि. 25.07.2026** पासून त्यावरील व्याज या थकबाकी रकमेच्या वसुलीसाठी "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे" या तत्वावर दि. 23.10.2026 रोजी विक्री करण्यात येईल.

अ. क्र.	मालमत्तेचे वर्णन	आरक्षित किंमत	बयाणा रक्कम ठेव
1	पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, अपार्टमेंट, फ्लॅट क्र. 1 तळमजल्यावर मोजमाप क्षेत्रफळ 31.71 चौ. मी. (कार्पेट क्षेत्रफळ 24.44 चौ. मी.) + बाल्कनी क्षेत्रफळ 5.580 चौ. मी. इंद्रायणी अपार्टमेंट म्हणून ओळखल्या जाणारया आरसीसी संरचनेत बांधलेल्या इमारतीमध्ये, जमीन संबंधित सर्व्हे क्र. 78/2 प्लॉट क्र. 1 मोजमाप क्षेत्रफळ 250.50 चौ. मी. त्यापैकी उत्तरेकडून जमीन मोजमाप 125.25 चौ. मी. यावर बांधलेले, गाव बोल्हेगाव, तालुका अहमदनगर, जिल्हा अहमदनगर येथे स्थित आणि वसलेले, अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीत आणि उप-निबंधक, अहमदनगर यांच्या अधिकारक्षेत्रात.	रु. 11,35,000/-	रु. 1,35,000/-
2	पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, अपार्टमेंट फ्लॅट क्र. 3 पहिल्या मजल्यावर मोजमाप क्षेत्रफळ 30.86 चौ. मी. + बाल्कनी क्षेत्रफळ 5.580 चौ. मी. इंद्रायणी अपार्टमेंट म्हणून ओळखल्या जाणारया आरसीसी संरचनेत बांधलेल्या इमारतीमध्ये, जमीन संबंधित सर्व्हे क्र. 78/2 प्लॉट क्र. 1 मोजमाप क्षेत्रफळ 250.50 चौ. मी. त्यापैकी उत्तरेकडून जमीन मोजमाप 125.25 चौ. मी. यावर बांधलेले, गाव बोल्हेगाव, तालुका अहमदनगर, जिल्हा अहमदनगर येथे स्थित आणि वसलेले, अहमदनगर महानगरपालिका हद्दीत आणि उप-निबंधक, अहमदनगर यांच्या अधिकारक्षेत्रात.	रु. 11,05,000/-	रु. 1,10,500/-

बयाणा रक्कम ठेव **दि. 23.10.2026 रोजी सकाळी 10.30 वाजेपर्यंत** किंवा त्यापूर्वी जमा करण्यात यावी. बयाणा रकमेचा तपशील आणि इतर दस्तावेज सेवा पुरवठादारांकडे **दि. 23.10.2026 रोजी सकाळी 10.30 वाजेपर्यंत** किंवा त्यापूर्वी सादर करण्यात यावेत.

बँकेकडे दस्तावेज **दि. 23.10.2026 रोजी सकाळी 10.30 वाजेपर्यंत** सादर करावेत.

विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया कॅनरा बँकेच्या वेबसाईटवर (www.canarabank.com) दिलेली 'ई-लिलाव' लिंक पाहावी किंवा श्री. सुदर्शन जोशी, प्राधिकृत अधिकारी, कॅनरा बँक, एआरएम शाखा, मुंबई (मोबाइल क्र. 8655948054) किंवा श्री. सुनील प्रतिहस्त (मोबाइल क्र. 9511662963). ई-मेल आयडी : cb2360@canarabank.com यांचेशी कोणत्याही कामकाजाच्या दिवशी कामकाजाच्या वेळेत संपर्क साधावा किंवा सेवा पुरवठादार Baanknet. (मे. पीएसबी अलायन्स प्रा. लि.), (संपर्क क्र. 7046612345 / 6354910172/ 8291220220 / 9892219848 / 8160205051, ईमेल: support.baanknet@psballiance.com/ support.baanknet@procure247.com) यांचेशी संपर्क साधावा.

दिनांक : 01.10.2026 स्थान : मुंबई

स्वा./- प्राधिकृत अधिकारी, कॅनरा बँक, एआरएम शाखा

TYGER HOME FINANCE

टायगर होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : युनिट क्र. 609 आणि 610, 6वा मजला, मॅजेस्टिक, लॉ गार्डन जवळ, पंचवटी रोड, एलिसब्रिज, अहमदाबाद, गुजरात - 380 006. कॉर्पोरेट कार्यालय : 1004/5, 10वा मजला, सी-विंग, वन बीकेसी, सी-66, जी-ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-400051, महाराष्ट्र, भारत.

CIN : U65999GJ2017PTC098960, वेबसाईट : www.tygerhomefinance.in

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी, **टायगर होम फायनान्स प्रा. लि.** (पूर्वी मे. अदानी हाऊसिंग फायनान्स प्रा. लि. म्हणून ओळखले जाणारे, **दि. 6 जून 2024** रोजी कंपनीचे निबंधक कार्यालय, कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालयाने जारी केलेले इन्कॉर्पोरेशनचे प्रमाणपत्र नुसार, यापुढे **'टीएचएफपीएल'** म्हणून संदर्भित) चे प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी वित्तिय मत्तेची सुरक्षितता व पुनर्रचना आणि सुरक्षा हित कायदा, 2002 च्या अंमलबजावणीच्या नियम 8(1) अनुपालनार्थ आणि सुरक्षा हीत (अंमलबजावणी) नियम 2002 च्या नियम 3 यासह वाचलेल्या कलम 13(12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत उक्त सूचनांच्या स्वीकृतीच्या दिनांकापासून / सूचनांच्या दिनांकापासून **60 दिवसांच्या आत** प्रत्येक अकाउंटच्या अनुसार नमूद केल्यानुसार रकमेची परतफेड करण्याकरिता संबंधित ऋणकोंवर फर्माविणारी प्रत्येक अकाउंटच्या अनुसार नमूद केलेल्या दिनांका दिवशी **मागणी सूचना** निर्गमित करण्यात आली आहे / आल्या आहेत.

ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, ऋणको तसेच आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की निम्नस्वाक्षरीकारांनी प्रत्येक अकाउंटच्या अनुसार नमूद केलेल्या दिनांका दिवशी उक्त नियमांच्या नियम 8 यासह वाचलेल्या उक्त कायद्याच्या कलम 13(4) अंतर्गत त्याला / तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अमंलबजावणीत याखाली वर्णिलेल्या **मालमत्तेचा ताबा घेतला आहे.**

विशेषकरुन ऋणको तसेच आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करु नये आणि मालमत्तेशी केलेला कोणताही व्यवहार कर्ज करारनाम्यानुसार त्यावरील व्याज आणि रकमेकरिता **टायगर होम फायनान्स प्रा. लि.** (अदानी हाऊसिंग फायनान्स प्रायव्हेट लि.) च्या आकाराच्या विषयाधीन असेल. सुरक्षित मत्तेच्या विमोचनाकरिता उपलब्ध वेळेत कायद्याच्या कलम 13 च्या पोट-कलम (8) व (9) च्या तरतुदींकडे ऋणकोंचे लक्ष वेधीत आहोत.

| अ. क्र. | कर्ज खाते क्र. / जुना कर्ज खाते क्र. | ऋणको / सह ऋणको / हमीदाराचे नाव | मागणी सूचना दि